# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

क्र. झोपुप्रा/अभि/कार्या-४/सीइओ/१०८९०/टे-ई
दि. १२-११-२०१०

**परिपत्रक क्र.** ११९

विषय : शासनाकडून प्राप्त झालेल्या महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.आणि पु.) अधिनियम १९७१ च्या कलम ३ के(१) अन्वये आदेशानंतर करावयाची कार्यवाही.

संदर्भ : शासन पत्र क्र. झोपुयो २०१०/प्र.क्र. १४७ व १५२/झोपसू-१ दि. ११-११-२०१०

केंद्र शासनाच्या "राजीव आवास योजने" अंतर्गत नमूद केलेल्या "झोपडपट्टी मुक्त शहर" हे उद्दिष्ट सफल होण्याच्या दृष्टिने, महाराष्ट्र शासनाने दि. २३-७-२००७ रोजी प्रसिध्द केलेल्या नवीन गृहनिर्माण धोरणातील परिच्छेद क्र. ७.२ आणि ७.३ मध्ये नमूद केल्यानुसार मोठ्या आकाराच्या झोपडपट्ट्यांचे एकात्मिक, एकसंघ आणि सर्व समावेशक झोपडपट्टी पुनर्वसन करण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार मोठ्या आकाराचे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे विविध प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त झाले आहेत.

त्या अनुषंगाने शासनाकडून महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम १९७१ च्या कलम ३ के(१) अन्वये गलिच्छ वस्तीच्या पुनर्विकासासाठी प्रस्तावित विशेष वसाहत प्रकल्प राबविण्यासाठी विशेष निर्देश प्राप्त झाल्यानंतर, अशा मोठ्या आकाराच्या झो. पु. योजना गतिमानरित्या राबविण्यासाठी पुढील कार्यप्रणालीचा अवलंब करावा.

१) प्रस्तुत प्रकरणी प्रस्तावित विशेष वसाहत प्रकल्पास शासनाचे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र अधिनियम १९७१ च्या कलम ३ के(१) अन्वये मंजुरी आदेश प्राप्त झाल्यानंतर संपूर्ण विशेष वसाहत प्रकल्पाच्या एकत्रित क्षेत्रासाठी प्रमाणित परिशिष्ट-२ आणि प्रमाणित परिशिष्ट-३ साठी न थांबता योजनेच्या संपुर्ण क्षेत्रासाठी आशयपत्र (LOI) पारित करण्यात यावे.

आशयपत्र घेताना विकासक आणि वास्तुविशारदाने संबंधित योजनेचा प्रयोगात्मक (Tentative) कालबध्द विभागवार पुनर्वसन कार्यक्रम (Sectorwise rehabilitation programme) व ले-आऊट सादर करावा. तसेच विशेष समूह वसाहत प्रकल्पासाठी शासनाचे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.आणि पु.) अधिनियम १९७१ च्या कलम ३ के(१) अन्वये मंजुरी देताना घातलेल्या इतर अटींचे व शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे. त्याप्रमाणे सदर बाबींच्या पुर्ततेसाठी नोंदणीकृत बंधपत्र (Registered under taking) विकासकाकडून घेण्यात यावे.

२) प्रस्तुत प्रकरणी प्रथम आशयपत्र देतेवेळी प्रस्तावित विशेष वसाहत प्रकल्पामधील समावेश असलेल्या शासन/म्हाडा/मुंबई महानगरपालिका इत्यादींच्या मालकीच्या जमिनीच्या क्षेत्रावर अधिमूल्य भार (Land Premium) शासन निर्णय क्र. झोपुयो २००८/प्र.क्र. २३६/झोपसु-१ दि. २-७-२०१० नुसार वसूल करण्यात यावा.

३) आशयपत्र (LOI) पारित केल्यानंतर पर्यावरण व वन खाते (MOE & F) यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

४) आशयपत्र घेतल्यानंतर इतर झो. पु. योजनांप्रमाणे विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) च्या ॲपेंडिक्स-४ च्या कलम १.१५ मधील तरतुदीनुसार सादर करावयाची ७०% झोपडीधारकांची संमती

विभागवार (Sectorwise) मसुदा परिशिष्ट २ सोबत सादर करावी व त्यानुसार विभागवार परिशिष्ट-२ सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्रमाणित करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

५) विशेष समुह वसाहत प्रकल्पासाठी विभागवार (Sectorwise) परिशिष्ट-३ घेण्याच्या कार्यपध्दतीबाबत प्राधिकरणाचे आर्थिक सल्लागार (F.C./SRA) यांनी कार्यवाही करावी.

६) अ) विभागवार प्रयोगात्मक (Sectorwise tentative) ले-आऊट मंजूर केल्यानंतर विभागवार (Sectorwise) प्रमाणित परिशिष्ट-२ व परिशिष्ट-३ संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त झाल्यानंतर तसेच संबंधित विभागामधील (Sector) ७०% पात्र झोपडीधारकांचे संमतीपत्रे (common consent) विकासकाने सक्षम प्राधिकाऱ्यांकडे सादर केल्यानंतर त्या विभागातील (Sector) बांधकामास आय.ओ.ए. व तत्सम परवानग्या देण्यात येतील.

ब) विभागवार प्रयोगात्मक (Sectorwise tentative) ले-आऊट मंजूर केल्यानंतर विभागवार (Sectorwise) प्रमाणित परिशिष्ट-२ व परिशिष्ट-३ संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त झाल्यानंतर तसेच संबंधित विभागामधील (Sector) ७०% पात्र झोपडीधारकांचे वैयक्तिक करारनामे विकासकाने सादर केल्यानंतर त्या विभागातील (Sector) बांधकामास सी.सी. इत्यादी परवानग्या नियमाप्रमाणे देण्यात येतील.

क) सदर प्रकरणी वर नमूद केल्याप्रमाणे योजनेमध्ये विभागवार (Sectorwise) पुनर्वसन/विक्रीच्या इमारतींसाठी आय.ओ.ए./सी.सी. देण्यासाठी सदर इमारतींच्या बांधकाम क्षेत्राच्या प्रमाणात शासन निर्णय क्र. झोपुयो २००८/प्र.क्र. २३६/झोपसु-१ दि. २-७-२०१० मधील धोरणानुसार अधिमूल्य भाग (Land Premium) विभागवार (Sectorwise) वसुल करण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

**१) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहायक**
**२) सचिव (झोपुप्रा) यांचे स्वीय सहायक**
**३) वित्त नियंत्रक (झोपुप्रा) यांचे स्वीय सहायक**
**४) लेखा शाखा**
**५) उप मुख्य अभियंता (झोपुप्रा)**
**६) कार्यकारी अभियंता-१,२,३ (झोपुप्रा)**
**७) उप जिल्हाधिकारी (झोपुप्रा)**
**८) विधि सल्लागार (झोपुप्रा)**
**९) सहायक संचालक, नगर रचना**
**१०) सहायक निबंधक (झोपुप्रा)**
**११) जनसंपर्क व प्रशासकीय अधिकारी**
**१२) माहिती व तंत्रज्ञान विभाग (झोपुप्रा)**
**१३) प्रशासन निवडनस्ती**